# अटी व शर्ती

१. दरपत्रके/निविदा सादर करण्याची मुदत दि. २८/०३/२०२४ रोजी संध्याकाळी ठीक ५.०० वाजेपर्यंत असेल. त्यानंतर प्राप्त दरपत्रके विचारात घेतली जाणार नाही.

२. दरपत्रकांचे/निविदांचे बंद लिफाफे दि. ०९/०२/२०२३ रोजी दुपारी ठीक १२.०० वाजता महामंडळाच्या मा. व्यवयस्थापकीय संचालक यांचे दालनात, स्वत: व्यवस्थापकीय संचालक, महामंडळाचे अन्य अधिकारी व निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहिल्यास यांचे समक्ष उघडण्यात येतील.

३. सदर निविदेकरीता रु.२०००/- निविदा शुल्क आकारले जाईल. संकेतस्थळावरील कार्यालयाच्या बँक खाते तपशीलावर सदर रक्कम भरणा करुन पावती दरपत्रकासोबत सादर करणे आवश्यक राहील.

४. निविदा मंजूर झाल्यास निविदामुल्याच्या ५% रक्कम राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्षाद्वारे ८ दिवसाच्या आत महामंडळाच्या कार्यालयास जमा करावी लागेल.

५. निविदा स्विकृत केल्यानंतर कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यावर संस्थेला १० दिवसाच्या आत रु. ५००/- च्या Stamp Paper वर करारनामा कार्यालयास स्वाक्षरीसह सादर करावा लागेल.

६. दरपत्रक/निविदा सादर करणाऱ्या संस्थेस (Firm) कामाचा किमान २ वर्षाचा अनुभव असावा. सामाजिक न्याय विभागातंर्गत महामंडळाच्या/शासनाच्या इतर महामंडळाच्या लेखाविषयक कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य दिले जाईल. त्यासंबधीत आवश्यक कागदपत्र जोडावे.

७. संस्थेचे मुख्य कार्यालय मुंबई महानगर परिक्षेत्रात असावे.

८. संस्थेची वार्षिक उलाढाल ५० लाख पेक्षा कमी नसावी. मागील दोन वर्षाचे याबाबतचे अहवाल सादर करावे.

९. निविदाकार संस्था C&AG च्या पॅनल वर नोंदणीकृत असावी व संस्थेमध्ये कमीत कमी दोन भागीदार असावे.

१०. संस्था व भागीदार यांची वैयक्तिक माहीती जसे नाव, पत्ता, E-Mail Address, दुरध्वनी क्रमांक, संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र इत्यादी माहीती दरपत्रकासोबत सादर करावी.

११. निविदाकारांनी GST नोंदणी प्रमाणपत्र व PAN CARD प्रत सादर करणे आवश्यक आहे.

१२. निविदाकारानी/संस्थेनी त्यांच्या संस्थेचे नाव काळ्या यादीत (Blacklisted) समाविष्ट नसल्याबाबतचे स्वयंघोषणा प्रमाणपत्र सादर करावे.

१३. कामकाजादरम्यान गोपनियता बाळगण्याचे स्वयंघोषणा प्रमाणपत्र सादर करावे.

१४. दरपत्रिकेत नमूद केलेले दर प्रचलीत दरापेक्षा अवास्तव असू नये.

१५. कार्यारंभ आदेश दिल्याच्या तारखेपासून दर करारातील दर लागू होतील व यात कोणत्याही कारणास्तव पुढील कालावधीत बदल वा दरवाढ लागू केली जाणार नाही.

१६. सन २०२४-२५, २०२५-२६ व २०२६-२७ या तीन वर्षांच्या कामकाजास्तव निविदाकाराने/संस्थेने एकत्रित शुल्क (नियमानुसार सर्वप्रकारच्या करासहीत) दरपत्रिकेत नमूद करावे.

१७. समाधानकारकरित्या काम झाल्याची खात्री करुनच निवड झालेल्या संस्थेच्या रक्कमेची अदायगी त्यांनी सादर केलेल्या देयकाच्या (आवश्यक कर वळते करुन) अनुषंगाने करण्यात येईल.

१८. दरपत्रके/निविदा छाननीबाबतचा अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार कंत्राट मूल्याप्रमाणे महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक यांचेकडे राखून ठेवण्यात येतील. सदर निर्णय निविदाकार/कंत्राटदार/संस्था मान्य करणे यांना बंधनकारक राहिल.

१९. निवड झालेल्या निविदाकार/संस्थेकडून नेमून दिलेल्या कामामध्ये कोणत्याही प्रकारची कसूर झाल्यास अथवा अटी शर्तींचे उल्लंघन झाल्यास महामंडळाकडे जमा केलेल्या सुरक्षा ठेव/अनामत रक्कमेतून काही भाग अथवा संपूर्ण रक्कम जप्त करण्याचे अधिकार महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांना असतील.

२०. व्यवस्थापकीय संचालक यांना कोणत्याही वेळी कोणतेही कारण न दर्शविता निविदाकारास एक महिन्याची अगाऊ नोटीस देऊन करारनामा रद्द करण्याचा/संपुष्टात आणण्याचा अधिकार असेल.

सही/-

**(अभय करगुटकर)**
**व्यवस्थापकीय संचालक**
**महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास**
**महामंडळ, मुंबई**